चेक

कल्याण बारावे रिंग रोडलगत साकारणार ऑटिझम व्हिलेज

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतर्फे बारावे रिंग रोडलगत ऑटिझम व्हिलेज उभारण्यात येत आहे. सुमारे १२ हजार ७७२ चौ.मी. क्षेत्रात विकसित होणाऱ्या या प्रकल्पात एका भागात ऑटिझमग्रस्त मुलांसाठी सुविधा असलेले व्हिलेज, तर दुसऱ्या भागात सर्वसामान्य नागरिकांसाठी उद्यान साकारले जाणार आहे. येथे संवेदी उद्यान, संवेदी मार्ग, खेळाची उपकरणे, ध्यान व उपचार केंद्र आदी सुविधा उपलब्ध होतील. यामुळे कडोंमपासह संपूर्ण एमएमआर परिसरातील ऑटिझमग्रस्त मुलांना थेरपी सुविधा मिळणार आहेत. उर्वरित उद्यान भागात कारंजे, बास्केटबॉल कोर्ट, ॲम्फीथिएटर, मियावाकी जंगल, स्केटिंग रिंग, जॉगिंग व सायकलिंग ट्रॅक, कॅफेटेरिया आणि सोलर यंत्रणा उभारली जाणार आहे. हा प्रकल्प मेरी रिॲलिटी या विकासकांमार्फत अमिनिटी टीडीआरमधून साकारला जात असून महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी २ एप्रिल रोजी जागतिक ऑटिझम जागरूकता दिनी या ऑटिझम व्हिलेजचे लोकार्पण होईल, यादृष्टीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

कल्याणमध्ये मॅटर्निटी हॉस्पिटलचे उद्घाटन

कल्याण : कल्याण शहराच्या आरोग्य सुविधांमध्ये महत्त्वाची भर घालत ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या मॅटर्निटी हॉस्पिटलचे उद्घाटन रविवारी झाले. कडोंमपा आयुक्त अभिनव गोयल आणि जी. एस. मेडिकल कॉलेजच्या डॉ. पौर्णिमा सातोस्कर यांच्या हस्ते अत्याधुनिक वैष्णवी मॅटर्निटी हॉस्पिटलचे लोकार्पण करण्यात आले. प्रसूतीतज्ज्ञ डॉ. अश्विन कक्कर यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या या रुग्णालयात तळमजला व सात मजल्यांची इमारत असून ४८ बेडची सुविधा उपलब्ध आहे. अत्याधुनिक शस्त्रक्रिया कक्ष, लेबर रूम तसेच नवजात अर्भकांसाठी विशेष संसर्गमुक्त व्यवस्था करण्यात आली आहे.

अंबरनाथमध्ये चिमुकल्याच्या मृत्यूनंतर रुग्णालयाबाहेर गोंधळ

अंबरनाथ : पूर्वेकडील महालक्ष्मी नगर परिसरातील एका खासगी रुग्णालयाबाहेर ५ वर्षीय मुलाच्या मृत्यूनंतर शनिवारी सायंकाळी तणावाची स्थिती निर्माण झाली. उपचारादरम्यान मुलाची प्रकृती खालावल्याने डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारांसाठी सायन येथील रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला होता. मात्र सायन रुग्णालयात उपचार सुरू असताना मुलाचा मृत्यू झाला. महालक्ष्मी नगर येथील खासगी रुग्णालयात चुकीचे उपचार झाल्यामुळेच मुलाची प्रकृती बिघडल्याचा आरोप करत नातेवाईकांनी रुग्णालयाबाहेर गोंधळ घातला. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. व.पो.नि.रमेश पाटील यांनी सांगितले की, प्राथमिक चौकशीत मुलावर योग्य उपचार करण्यात आले होते आणि तीन दिवसांपूर्वीच त्याला सायन रुग्णालयात पाठवण्यात आले होते. संबंधित डॉक्टरांनी नातेवाइकांचे सर्व आरोप फेटाळले असून, मुलाचा मृत्यू सायन रुग्णालयात झाल्याचे स्पष्ट केले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव एका महिला डॉक्टरला पोलीस ठाण्यात नेण्यात आले. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

नवी मुंबईत विरोधी पक्षनेतेपदी तरुणांना संधी

अनिकेत म्हात्रे, ममित चौगुले, आकाश मढवी, सौरभ शिंदे यांची नावे आघाडीवर

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

नवी मुंबई महापालिकेत महापौर आणि उपमहापौर पदांची निवडणूक बिनविरोध पार पडल्यानंतर आता शहरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष विरोधी पक्षनेत्याच्या निवडीकडे केंद्रित झाले आहे.

शिवसेनेकडून ऐनवेळी माघार घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली असून, त्यामुळे विरोधी पक्षनेता हा शिवसेनेचाच असेल, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. दरम्यान, नवी मुंबईकरांकडून विरोधी पक्षनेतेपदासाठी युवा नेतृत्वाला संधी देण्याची जोरदार मागणी पुढे येत आहे. विशेषतः शिवसेनेतील तरुण नेत्यांना ही जबाबदारी सोपवावी, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. शिवसेना युवा जिल्हाध्यक्ष अनिकेत म्हात्रे, ठाणे जिल्हा युवा अध्यक्ष ममित चौगुले, उपमहापौरपदासाठी निवडणूक लढवलेले आकाश मढवी तसेच नवनिर्वाचित नगरसेवक सौरभ शिंदे यांची नावे चर्चेत आहेत. संघटनेत नव्या पिढीला पुढे आणण्याची प्रक्रिया शिवसेनेने सुरू केल्याचेही स्पष्ट होत आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीत पराभूत झालेले शिवसेनेचे दिग्गज नेते एम. के. मढवी, सोमनाथ वास्कर आणि नामदेव भगत यांना सत्ताधाऱ्यांवर प्रभावी अंकुश ठेवण्यासाठी 'स्वीकृत सदस्य' म्हणून सभागृहात पाठवले जाईल, अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

महापालिकेत कामगार नेता म्हणून शिवसेनेकडून रवींद्र सावंत यांची वर्णी लागण्याचीही दाट शक्यता आहे. नवी मुंबई पालिकेतील सुमारे दोन ते अडीच हजार कामगारांचे नेतृत्व सावंत करीत असून, त्यांच्या अनुभवामुळे शिंदे गटाची पालिकेतील ताकद अधिक बळकट होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

उबाठाचा 'बेपत्ता' नगरसेवक शिवसेनेच्या मंचावर

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील उबाठाचे 'बेपत्ता' नगरसेवक राहुल कोट अचानक शिवसेनेच्या महापौर हर्षाली थविल चौधरी आणि भाजप आमदार निरंजन डावखरे यांच्यासोबत एका शाळेच्या कार्यक्रमात दिसल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. माध्यम प्रतिनिधींनी "इतके दिवस कुठे होतात?" असा प्रश्न विचारताच राहुल कोट यांनी "नंतर बोलू" असे म्हणत कार्यक्रमातून घाईघाईने काढता पाय घेतला.

निवडणुकीनंतर सार्वजनिकपणे न दिसणाऱ्या नगरसेवकाच्या उपस्थितीमुळे अंतर्गत राजकारणावर तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. पळाल्यामुळे संशय अधिकच गडद झाला आहे. उबाठाचे मधुर म्हात्रे, राहुल कोट आणि स्वप्नाली केणे हे अद्याप माध्यमांपासून दूर असल्याने कल्याणच्या राजकारणात नेमके काय घडतेय, याबाबत उत्सुकता वाढली असून ठाकरे गटाकडून पुढे काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आगीत १० ते १२ गोदामे जळून खाक

भिवंडी : मानकोली येथील हरिहर कंपाऊंड परिसरात रविवारी गादी व पेपर रोलच्या गोदामांना भीषण आग लागली. या आगीत सुमारे १० ते १२ गोदामे पूर्णतः जळून खाक झाली असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आग वेगाने पसरून गोदामांच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यांपर्यंत पोहोचली. दरम्यान, वीजपुरवठा बंद होण्यास विलंब झाल्याने आगीची तीव्रता वाढल्याचे सांगण्यात येत आहे.

लता दीदींच्या गीतांतील विचार समजल्यास जीवन समृद्ध

गायिका डॉ. मृदुला दाढे-जोशी यांचे प्रतिपादन

◆ **ठाणे (प्रतिनिधी):**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर या आपल्या भावविश्वाचा अविभाज्य भाग असून त्यांच्या प्रत्येक गीतामागे एक सखोल विचार दडलेला आहे. तो विचार समजून घेतला, तर जीवन अधिक समृद्ध होऊ शकते, असे मत गायिका व संगीत अभ्यासक डॉ. मृदुला दाढे-जोशी यांनी व्यक्त केले. ठाणे पूर्व येथील सुयश कला-क्रीडा मंडळाच्या वतीने श्री सिद्धिविनायक मंदिराच्या प्रांगणात भरविण्यात आलेल्या २२ व्या व्याख्यानमालेत त्यांनी 'अमृतलता' या विषयावर लता दीदींच्या गायकीचे मर्म उलगडले.

लतादीदींच्या गायकीत माधुर्य, शिस्त आणि भावनांची सूक्ष्मता यांचे सुंदर मिश्रण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या गाण्यांनी भारतीय संगीतविश्वाचा कॅनव्हास व्यापक केला आणि अनेक संगीतकार व गायकांना नवी दिशा दिली, असेही डॉ. जोशी यांनी नमूद केले.

कार्यक्रमात त्यांनी विविध गीतांच्या माध्यमातून लता मंगेशकर यांच्या आवाजातील वैशिष्ट्ये रसिकांसमोर सादर केली. या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

जाहीर नोटीस

अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कुडाळ यांचे कोर्टात

केस क्रमांकःएएलटी/३२(ओ)/एसआर/४९/२०२५

श्री. काळू सखाराम जाधव ---------- **अर्जदार**
रा. भीमनगर, समाज मंदिर घावनळे,
ता. कुडाळ,जि. सिंधुदुर्ग

विरुध्द

१) श्रीम. अमृता सदाशिव कळसुलकर
२) श्री. निनाद उर्फ नारायण सदाशिव कळसुलकर
३) श्रीम. नेहा सदाशिव कळसुलकर
४) श्रीम. ललिता सुभाष असगेकर---------- **सामनेवाले**
५) श्रीम. शमिदा सदाशिव कळसुलकर
६) श्रीम. सुरेखा सदाशिव कळसुलकर
सर्व सामनेवाले रा. घावनळे,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ (ओ) अन्वये कार्यवाही

तमाम लोकांना या जाहीर कळविण्यात येते की, कुडाळ तालुक्यातील गाव मौजे घावनळे येथील खाली नमूद सर्वे वर्णनाचे जमिन नोटीशीने मिळकतीचा कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ओ) अन्वये दावा क्रमांक ४९/२०२५ ने कुडाळ येथील अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण यांचे कोर्टात चालू आहे.

जमिनीचा तपशिल

अ. क्र.	गावाचे नाव	सर्वेनंबर/ हि.नंबर	क्षेत्र हे.आर.	पो.ख. हे.आर.	आकार रु.पै.
१	घावनळे	५१/१७	०.०६.००	०.०१.००	०.०३

दावा मिळकतीमधील जमिन मालक म्हणजेच सामनेवाले यांच्या नोटीसा दिलेल्या पत्त्यावर पाठविले असता ते सदर ठिकाणी राहत नसल्याने व त्यांचे सध्याचा वास्तव्याचा पत्ता उपलब्ध नसल्याने नोटीसा बजावणीची कार्यवाही पूर्ण झालेले नाही. वर नमुद दावा मिळकतीची तहसिलदार कुडाळ यांचे न्यायालयात अर्जदार यांनी कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२(ओ) अन्वये विक्री होऊन मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, वर नमुद सामनेवाले, हितसंबधी यांचे कायदेशीर वारस अगर कुलमुखत्यारी किंवा दाव्यामध्ये अन्य कोणाचा कोणत्याही स्वरुपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी दिनांक १३/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कुडाळ यांचे न्यायालयात ठोस पुराव्यासह उपस्थित राहावे अन्यथा सामनेवाले यांस काहीही सांगावयाचे नाही व त्यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदरहू दावा मिळकती संदर्भात ३२ (ओ) अन्वये विक्री करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येवून सुनावणीचे कामकाज पूर्ण करणेत येईल म्हणून दिली जाहीर नोटीस.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

ठिकाणः कुडाळ
दिनांकः २३/०१/२०२६

सही/-
(सचिन पाटील)
अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कुडाळ

शिक्का

'टेनिस क्रिकेट फेडरेशनमुळे मुलांचे क्रिकेटर होण्याचे स्वप्न साकारणार'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

"आज अनेक मुलांचे क्रिकेटर होण्याचे स्वप्न असते; मात्र प्रत्येकालाच आयपीएल, टेस्ट किंवा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपर्यंत पोहोचणे शक्य होत नाही. अशा तरुणांसाठी टेनिस क्रिकेट हे करिअर घडवणारे प्रभावी माध्यम ठरू शकते. टेनिस क्रिकेट स्पोर्ट्स फेडरेशनच्या माध्यमातून सर्वसामान्य मुलालाही खेळात स्वतःचे भविष्य घडवण्याची संधी मिळू शकते," असे प्रतिपादन कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केले. टेनिस क्रिकेट स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाची (आयटीसीएसएफ) पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा ठाणे येथे पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. श्रीकांत शिंदे यांची फेडरेशनच्या 'राष्ट्रीय अध्यक्ष'पदी अधिकृत निवड झाल्याची घोषणा करण्यात आली.

या सभेला देशभरातील फेडरेशनचे पदाधिकारी, क्रीडा क्षेत्रातील प्रतिनिधी, स्पर्धा आयोजक, संघ मालक, माजी खेळाडू तसेच क्रीडाप्रेमी उपस्थित होते. निवडीनंतर बोलताना शिंदे म्हणाले, "कल्याणमध्ये क्रिकेट, टेनिस मोठ्या प्रमाणावर खेळले जाते. प्रत्येक खेळाला प्राधान्य देण्याची हीच भूमिका आमच्या सरकारची आहे. टेनिस क्रिकेट आधीपासूनच लोकप्रिय असून, त्याला अधिक व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी फेडरेशन सातत्याने प्रयत्न करेल." असे आश्वासन शिंदे यांनी दिले.

'पोलीस' नेमप्लेट; मद्यधुंद चालकाची वाहनांना धडक

नवी मुंबई : करावे गावाजवळ मद्यधुंद वाहनचालकाने भरधाव वेगात अनेक वाहनांना धडक दिली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले. इनोव्हावर 'पोलीस' अशी नेमप्लेट लावलेली असल्याचे आढळून आली. गाडीच्या तपासणीत मुंबई पोलिसांचे व. पो. नि. अरुण बबन पोखरकर यांचे ओळखपत्र सापडले. त्यामुळे प्रकरण गंभीर बनले.

मुरबाडमधील ३०७ शेतकऱ्यांचे भातपिकाचे पैसे रखडले

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यात आलेल्या गतवर्षीच्या खरीप हंगामातील भातपिकाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. शेतकरी आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. माळ मठावर भात विक्री केलेल्या शेतकऱ्यांनी रविवारी एकत्र येत आंदोलनाचा इशारा दिला. धसई केंद्रातील ४३, माळ केंद्रातील २३६ आणि पाटगाव केंद्रातील २८ असे एकूण ३०७ शेतकऱ्यांचे पैसे अद्याप प्रलंबित आहेत.

या प्रकरणी ठाणे–पालघर सहकार बोर्डाचे संचालक प्रकाश पवार यांनी पालकमंत्री एकनाथ शिंदे, मुरबाडचे आमदार किसन कथोरे, जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला आहे. सातबाऱ्यावर पीक पेरणीच्या नोंदी शिथिल करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

आमदार किसन कथोरे यांनी दहा दिवसांच्या आत पैसे मिळतील, असे आश्वासन दिले आहे. १७ फेब्रुवारीपर्यंत रक्कम जमा न झाल्यास १८ फेब्रुवारीला शहापूर येथील आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. आगामी खरीप हंगामासाठी भात खरेदी तातडीने सुरू करावी, प्रतिदिन खरेदीची मर्यादा ३०० क्विंटलवरून हजार क्विंटलपर्यंत वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

एनआयएफटी परीक्षा केंद्रावर घाणीने विद्यार्थी बेजार

कल्याण : पश्चिमेकडील कल्याण कृषी बाजार समितीच्या आवारातील धान्य गोदामात रविवारी एनआयएफटी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) प्रवेश परीक्षेचे केंद्र ठेवण्यात आल्याने विद्यार्थी व पालक संतप्त झाले. अडगळीच्या जागेत असलेल्या या केंद्र परिसरात तीव्र दुर्गंधी, अस्वच्छता आणि मूलभूत सुविधांच्या अभावामुळे पहाटेपासून आलेल्या विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मुंबई, वसई-विरार, मीरा-भाईंदरसह विविध भागांतून विद्यार्थी पहाटे तीन-चार वाजल्यापासून येथे पोहोचले होते. मात्र केंद्रात पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, बसण्याची सोय नसल्याने विशेषतः महिला व पालकांचे हाल झाले. परिसरात कत्तलखाना असल्याने उग्र दुर्गंधी पसरली असून काही विद्यार्थ्यांना मळमळ झाल्याचेही सांगण्यात येत आहे. दरम्यान, एनआयएफटीने प्रत्येक विद्यार्थ्यांकडून २ हजार रुपयांचे शुल्क आकारले असताना अशा ठिकाणी परीक्षा केंद्र निश्चित केल्याबद्दल पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. बाजार समितीतील धान्य गोदाम परीक्षा केंद्र म्हणून निश्चित करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी पालक व विद्यार्थ्यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासन
उप संचालक (दक्षिण) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय
Tel. No.022 28860362 E-mail-ddssgnp@gmail.com
ई-निविदा सुचना
पात्रताधारक कंत्राटदाराकडून खाली नमुद केलेल्या कामांकरीता ई-निविदा मागविणेत येत आहेत.

Particulars	Details
Name of the Work:	Open Tender for Appointment of Agency for Operation and Management of Government Restaurant in South Division of Sanjay Gandhi National Park
Address and Concerned person for Correspondence	Deputy Director (South), Sanjay Gandhi National Park Address: Borivali East, Mumbai, Maharashtra 400066 Phone: 022 2886 0362/022-28860389 Email:ddssgnp@gmail.com
Availability of Tender - Start Date and Time	10/02/2026 02:00 PM
Online Bid Submission Date	11/02/2026 02:00 PM
Online Bid Submission End Date	19/02/2026 02:00 PM
Date and time for opening of Technical Proposal	20/02/2026 02:00 PM
Method of submission of Proposal	Only through e-Procurement portal: website: http://mahatenders.gov.in

अटी व शर्ती
१. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिध्दी आवश्यक असणारी कागदपत्रे शुध्दीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध होईल.
२. वरील कामाची ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर वरील दिलेल्या कालावधीत असेल.
३. निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम e-payment पध्दतीने स्विकारण्यात येईल.
४. कामाची ई-निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूर्ण कामाची माहिती घेऊन ई-निविदा सादर करावी, नमूद केलेले दर सर्व करांसहित असावेत.
५. कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या ई-निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी राखून ठेवला आहे.
तसेच वनविभागाच्या https://mahaforest.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेली आहे.
तरी इच्छूक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून ई-निविदा सादर करावे.

सही/-
(किरण पाटील)
उप संचालक (दक्षिण),
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली

डीजीआयपीआर २०२५-२६ / सी ५६१३

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक
UJJIVAN
नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

अनु. क्र.	कर्ज खाते क्र./ शाखा	कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव	१३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआर मध्ये
1	4435210130000009 / 4435- बोरीवली	१. महेंद्र एकनाथ नवले, २. मनस्वी महेंद्र नवले, दोघांचा पत्ताः ए/ ३०४, धीरज पॅलेस सीएचएसएल, आचोळे रोड, गाला शिर्डी नगर, नालासोपारा पूर्व, वसई, ठाणे, महाराष्ट्र – ४०१२०९. अनु. क्र. १ येथे देखील : माऊली एन्टरप्रायझेस, दुकान क्र. ०४, गणेश नगर, ओस्तवाल नगरी, प्रगोती, नगर पोलीस चौकी, नालासोपारा, महाराष्ट्र – ४०१२०९.	२४.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. ४४५४७७४.१/-	09.09.2025	Rs.8,44,000/- / Rs.84,400/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : सर्वे क्र. २४ ए आणि २४ डी मिलिटरी स्कूल जवळ, पास्थल नाका, गाव पास्थल नाका, गाव, बोईसर (प), ता. आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या सदनिका क्र. ३०६ (४५० चौ.फू. म्हणजेच ४१.८२ चौ. मी.) व्यापती असलेल्या ए विंग च्या तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०६ चा सर्व खंड आणि भूखंडासह त्यावरील इमारतीचे बांधकाम आणि त्यामधील सर्व सुधारणा.				
2	4435210130000009 / 4435- बोरीवली	१. महेंद्र एकनाथ नवले, २. मनस्वी महेंद्र नवले, दोघांचा पत्ताः ए/ ३०४, धीरज पॅलेस सीएचएसएल, आचोळे रोड, गाला शिर्डी नगर, नालासोपारा पूर्व, वसई, ठाणे, महाराष्ट्र – ४०१२०९. अनु. क्र. १ येथे देखील : माऊली एन्टरप्रायझेस, दुकान क्र. ०४, गणेश नगर, ओस्तवाल नगरी, प्रगोती, नगर पोलीस चौकी, नालासोपारा, महाराष्ट्र – ४०१२०९	२४.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. ४४५४७७४.१/-	09.09.2025	Rs.8,44,000/- / Rs.84,400/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : सर्वे क्र. २४ ए आणि २४ डी मिलिटरी स्कूल जवळ, पास्थल नाका, गाव पास्थल नाका, गाव, बोईसर (प), ता. आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या सदनिका क्र. ३०७ (४५० चौ.फू. म्हणजेच ४१.८२ चौ. मी.) व्यापती असलेल्या ए विंग च्या तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०७ चा सर्व खंड आणि भूखंडासह त्यावरील इमारतीचे बांधकाम आणि त्यामधील सर्व सुधारणा.				
3	4411210130000533/ 4411- कोपरखैरणे	१. विनायक हरिश्चंद्र सावंत, २. प्राजक्ता सावंत दोघांचा पत्ताः जगन्नाथ कॉलनी, खोली क्र. एए चरण बाबा नगर, उल्हासनगर, ठाणे, महाराष्ट्र ४२१००४. अनु. क्र. १ येथे देखील : मायेहर अँड सन्स ४७ लतीफ हाऊस, ३ रा मजला, संत तुकाराम मार्ग, मस्जिद बंदर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४००००९	१८.०३.२०२४/ १३.०३.२०२४ अनुसार रु. १९०९४२८.५८/-	09.10.2025	Rs.13,54,000/- / Rs.1,35,400/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि जिल्हा कल्याणचा उप जिल्हामधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील गाव शिवाजीनगर, डोंबिवली (प), ता. कल्याण जिल्हा ठाणे येथील ११६० चौ. मी. मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १९, हिस्सा क्र. १३ ए वर बांधण्यात आलेल्या "श्री विठ्ठल कृपा" म्हणून ज्ञात असलेली इमारत, नवीन फायर ब्रिगेड ऑफिस समोर, सुभाष रोड, चिंचोडयाचा पाडा येथील ७ व्या मजल्यावरील २६२.५ चौ.फू. चटईक्षेत्र असलेली (सामाईक जागेसह) (म्हणजेच २४.३९ चौ. मी. चटईक्षेत्र) सदनिका क्र. ३०२. विनायक हरिश्चंद्र सावंत आणि प्राजक्ता विनायक सावंत ह्यांच्या मालकीचे				
4	4412210080000029/ 4412- ठाणे	१. नितेश हरेश गोस्वामी, २. श्रीमती रेश्मा प्रकाश आंब्रे. दोघांचा पत्ताः सदनिका क्र. ३०२, ३ रा मजला, श्री बालाजी अव्हेन्यू, कशेळी, ता. भिवंडी, ठाणे ४२१३०२.	०९.०१.२०२४/ ०८.०१.२०२४ अनुसार रु. ७८९५७७.८८/-	13.10.2025	Rs.11,73,000/- / Rs.1,17,300/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : भिवंडीच्या हद्दीमधील आणि नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्हा ठाणेमधील गाव कशेळी, ता. भिवंडी, जिल्हा ठाणे ४२१३०२ येथील जमिनीचा सर्वे क्र. १९७, हिस्सा क्र. ०४, गाव कशेळी वर उभ्या असलेल्या 'श्री बालाजी अव्हेन्यू' म्हणून ज्ञात इमारतीच्या ३ ऱ्या मजल्यावरील ४१५ चौ. फू. म्हणजेच ३८.५६ चौ. मी. बिल्टअप क्षेत्रफळ असलेल्या निवासी जागेचा सदनिका क्र. ३०२ (वास्तविक रेखांकनानुसार). पूर्वः अंतर्गत रोड, पश्चिम : खुला प्लॉट, उत्तर : काव्या श्रुष्टी बिल्डींग, दक्षिण : बंगला. आणि श्री. नितेश हरेश गोस्वामी ह्यांच्या मालकीचे.				
5	4505210050000006 / 4505- विरार	१) अमोल भारत माने, २) विद्या अमोल माने, दोघे येथे राहणार : खोली क्र. १०३, गंगा अपार्टमेंट गस, कोपरी शनी मंदिराजवळ, विरार, ठाणे महाराष्ट्र ४०१३०५. दोघे येथे देखील : रायवाडी, किरेवाडी, कवठे महाकाळ, सांगले, महाराष्ट्र – ४१६४०३. अनु. क्र. १ येथे देखील : कलावती गॅस डिस्ट्रिब्युटर्स, दुकान क्र. २४ गोकुळ अनेक्स, बिल्डींग अगरवाल गार्डन – II, मुलजीभाई मेहता स्कूल समोर, गोकुळ टाऊनशिप, विरार (प), ठाणे, महाराष्ट्र ४०१३०३	०७.०६.२०२४/ ०५.०६.२०२४ अनुसार रु. १२७६६०९.७२/-	18.11.2025	Rs.11,16,000/- / Rs.1,11,600/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : वसई १ ते ६ येथील अश्युरन्सचे उपनिबंधक ह्यांच्या क्षेत्रामधील गाव आगाशी, तालुका वसई जिल्हा पालघर येथे वसलेल्या एच. आर. २४२५ चौ. मी. मोजमाप असलेल्या गावठाण जमिनीचा धारण केलेला घर क्र. २३७६ वर बांधण्यात आलेल्या "ओमकार अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या कॉम्प्लेक्समधील बी विंगच्या ४ थ्या मजल्यावरील, विक्री योग्य मोजमाप ५५५ चौ. फू. म्हणजेच ५१.५७ चौ. मी. (सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ) (ज्यामध्ये बाल्कनीच्या क्षेत्रासह) मजल्याच्या आराखड्यानुसार सदनिकेचा धारण केलेला क्र. ४०१. जे अमोल भारत माने ह्यांच्या मालकीचे असलेले.				

मालमत्ता (मत्ता) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ	:: १२.०२.२०२६ आणि २३.०२.२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक	:: २६.०२.२०२६ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान
लिलावाचा दिनांक आणि वेळ	:: २७.०२.२०२६ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत), बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२११०१. संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, चंद्रमोहन चौधरी : ८१०८८३८२८६).

अटी आणि शर्ती : ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुक खरेदीदार यांन